CNR-MHDH05-000057-2015

नियमीत फौजदारी खटला क्र. ७/२०१५

सरकार – विरुध्द – रणजित बहिरम + ८

## निशाणी क्रमांक ७७ वर आदेश
## (पारित दिनांक १७ जुलै, २०२३)

आरोपी क्र. ५ व ६ यांचा अर्ज व त्यावरील सहायक सरकारी अभियोक्ता यांचे खुलाश्याचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**अर्ज** :

२. प्रस्तुत आरोपी क्र. ५ व ६ यांचेतर्फे इतर आरोपींपासून खटला स्वतंत्ररित्या चालविण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. ५ व ६ यांचे थोडक्यात कथन की, आरोपी क्र. ५ व ६ हे दर तारखेला हजर राहतात. आरोपी क्र. १, २, ३, ४, ७, ८ आणि ९ हे नेहमी गैरहजर राहतात. त्यामुळे खटला हा प्रलंबीत राहत आहे. सबब फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१७(२) अन्वये इतर आरोपींपासून त्यांचा खटला स्वतंत्र चालविण्याचा आदेश व्हावा, अशी त्यांनी विनंती केली.

**खुलासा** :

३. सदरच्या अर्जावर सहायक सरकारी अभियोक्ता यांनी हरकत घेतली. आरोपींविरुध्द न्यायालयाने दिनांक ०५.०१.२०२२ रोजी गैरजमानती अधिपत्र निर्गमीत करुन जमानतदारांना नोटीस काढली आहे. आरोपी क्र. ५ व ६ यांनी दिनांक १३.०४.२०२२ रोजी प्रत्येकी रुपये ५००/– दंड भरुन त्यांचे विरुध्दचे गैरजमानती अधिपत्र रद्द केले आहे. इतर

आरोपींविरुध्द न्यायालयाने गैरजमानती अधिपत्र निर्गमीत केले. आरोपी क्र. १ यांनी दिनांक १९.०५.२०२२ रोजी त्यांचे विरुध्दचा वॉरंटचा आदेश रद्द केलेला आहे. इतर आरोपी हे गैरहजर आहेत. जमानतदारांना न्यायालयाने नोटीस काढलेली आहे. त्यामुळे जामीनदारास नोटीस न बजविल्याने पोलीस अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजविण्यात यावी व अर्ज खारिज करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

**४.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. प्रकरण हे सन २०१५ असून भारतीय दंड विधानचे कलम ३७९ सह ३४ अन्वये दाखल करण्यात आले आहे. तीन आरोपींविरुध्द फौ.प्र.सं.चे कलम २९९ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. आरोपी क्र. १ ते ६ यांना न्यायालयाने जामीनावर मुक्त केल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. त्याबाबतचा आदेश दिनांक ११.०७.२०१३ रोजी पारित केल्याचा दिसून येतो. त्यानंतर फरार आरोपी पैकी आरोपी कलीम, यांनी दिनांक ३०.०८.२०१८ रोजी जामीन अदा केलेला आहे. त्यानंतर आरोपी कैसर, यांनी दिनांक ०१.०८.२०१८ रोजी जामीन अदा केला आहे. आरोपी जावेद, यांनी दिनांक २७.११.२०१८ रोजी जामीन अदा केल्याचा दिसून येतो.

**५.** आरोपी क्र. ५ व ६ यांचे विरुध्द गैरजमानती अधिपत्र निर्गमीत केल्यानंतर, त्यांना दिनांक १३.०४.२०२२ रोजी अटक करुन हजर केले होते. आणि त्यांनी न्यायालयात दाखल केलेल्या जामीन व अटी शर्तींचा भंग केला म्हणून प्रत्येकी

रुपये १५,०००/– दंड त्यांचेवर लादण्यात आला होता. त्यानंतर त्यांनी दंडाची रक्कम रुपये १०,०००/– भरण्याचा व उर्वरीत रक्कम नंतर अदा करण्यासाठी नि.क्र. ६१ अन्वये अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज न्यायालयाने मंजुर केला होता. त्यानंतर त्यांनी जामीन अदा केला. त्यानंतर त्यांनी प्रस्तुत अर्ज दिनांक ०३.०८.२०२२ रोजी दाखल केला.

**६.** इतर आरोपी हे गैरहजर आहेच. त्यामुळे न्यायालयाने त्यांचे विरुध्द गैरजमानती अधिपत्र निर्गमीत करावे, असा आदेश पारित केला. परंतु त्याबाबतचा अहवाल अभिलेखावर दाखल नाही. तसेच जमानतदारांना नोटीस बजावुन आली, याबाबतचा देखील कोणताही अहवाल दाखल नाही. इतकेच काय आरोपी क्र. ५ व ६ यांनी दिनांक १३.०४.२०२२ रोजीच्या न्यायालयाच्या आदेशाची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे या क्षणी आरोपी क्र. ५ व ६ यांचा खटला हा स्वतंत्र चालवावा, हे मला कायदेशीर व न्यायोचीत वाटत नाही. सबब अभिलेखावरील एकंदरीत परिस्थितीवरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: आदेश :**

**१.** अर्ज हा खारिज करण्यात येतो. आरोपी क्र. ५ व ६ यांना निर्देश देण्यात येते की, दिनांक १३.०४.२०२२, च्या आदेशाची पुर्तता करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2023.07.18 11:36:47 +0530

साक्री.

**(रा.भा. डोळे )**

दिनांक : १७.०७.२०२३.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री

**: प्रमाणपत्र :**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – १८.०७.२०२३.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३